## प्रकरण १

# संस्कृतमधील प्रहसनांचा उगम आणि विकास

व्याकरणाच्या दृष्टीने संस्कृत ही एक श्रेष्ठ व परिपूर्ण भाषा आहे. कृ` धातूला सम् हा उपसर्ग लागून संस्कृत हा शब्द बनतो. सम्यक् रीतीने केलेले, संस्कार केले गेलेले असा त्याचा अर्थ आहे ज्या भाषेवर व्याकरणाचे संस्कार झालेले आहेत ती संस्कृत भाषा. जगातील अनेक देशातील विद्वानांना संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास करावासा वाटतो. हे साहित्य कालातीत व अजरामर आहे.

संस्कृत साहित्यामध्ये वेद, ब्राह्मणे, आरण्यके, पुराणे, उपनिषदे, स्तोत्रे, खंडकाव्ये, गीतिकाव्ये, महाकाव्ये, रूपकप्रकार, चंपू, गद्यकाव्ये, कथासाहित्य, वगैरे अनेक प्रकारचे वाङ्मय अनेक कवींकडून रचले गेले.

साहित्याचे सृजन हे समाजातील समग्र रूपाचे, जीवनाचे दर्शन घडविण्यासाठी केले जाते. जीवनातील आनंद, दु:ख, आशा, निराशा अशा अनेक विविधतांचे कलेच्या माध्यमातून सृजन करुन अभिव्यक्ती करण्यात येते. जीवनातील आदर्शवाद आणि वास्तववाद यांचे संतुलित मिश्रण करुन समाजाला बोध देण्यासाठी साहित्याची निर्मिती केली जाते. या साहित्याच्या माध्यमातून समाजाचे थोडे तरी हित साधले जाते (स+हित) ते साहित्य होय.

विश्वनाथाच्या मते 'वाक्य रसात्मकं काव्यं ।' जे जे रसयुक्त वाक्य आहे ते ते काव्य होय. या उक्तीनुसार सर्व साहित्य काव्य ठरते. संस्कृत साहित्याचे दोन मुख्य प्रकार आहेत. १) दृश्य २) श्रव्य . संस्कृत साहित्यामधे रूपक हा एक वाङ्मय प्रकार आहे. रूपक हा प्रकार दृश्य या प्रकारात मोडतो. दृश्यं तत्राभिनेयम् । [१] डोळे या ज्ञानेंद्रियाने रूपकाचे रसग्रहण केले जाते. रूपक हे पाहायचेही असते तसेच ते ऐकायचेही असते. म्हणूनच त्याला 'दृक्श्राव्य' असेही म्हटले जाऊ शकते. मानवी जीवनातील घटनांचा गीत नृत्य, वाद्य, अभिनय आणि संवाद यांच्या साहाय्याने

रंगमंचावर घडविला जाणारा आविष्कार म्हणजे रूपक होय. या रूपकामध्ये एखादा नट एखादी भूमिका करतो म्हणजेच त्याच्यावर ती भूमिका आरोपित केली जाते. रूपक या साहित्यशास्त्रातील अलंकारामधे उपमेयावर उपमानाचा आरोप केला जातो. त्याच प्रकारे रूपक या प्रकारातही होत असते.

रूपं दृश्यतयोच्यते । [२]

ते डोळयांच्या सहाय्याने पाहता येते म्हणून रूप असे म्हणावे. यालाच भरतमुनींनी नाटय असेही नाव दिले आहे. नृत् या संस्कृत धातूचे नट् हे प्राकृत रूप आहे. या नाटय आणि रूपक असे नाव असलेल्या कलाप्रकाराचे वैशिष्टय हे आहे की यामधे लोकरीती, समाजाचे चित्रण केले जाते. भरतमुनींनी असेही म्हटले आहे की,

नाना भावोपसंपन्नं नानावस्थान्तरात्मकम् ।

लोकवृत्तानुकरणं नाटयमेतन्मया कृतम् ॥ [३]

या नाटयकलेचा उद्देश विविध रसांची निर्मिती करणे हा आहे. ज्यामुळे मनोरंजन आणि आनंदनिर्मिती होत असते. या कलेमध्ये जगातील सर्व भावांची निर्मिती होत असते.

त्रैलोक्यस्यास्य सर्वस्य नाटयं भावानुकीर्तनम् ॥ [४]

रूपकाविषयी कथन करताना आचार्य भरतांनी असेही म्हटले आहे की,

न तज्ज्ञानं न तत् शिल्पं न सा विद्या न सा कला ।

न स योगी न तत्कर्म नाटयेऽस्मिन् यन्नदृश्यते ॥ [५]

भरतमुनींनी नाटयशास्त्राची निर्मिती केली. पूर्वीच्या काळी वेदाध्ययनाचा अधिकार फक्त उच्चवर्णीयांनाच होता. स्त्रिया व शूद्र यांना वेदपठण सुरू असताना तेथे येण्याचीही परवानगी नव्हती. म्हणूनच सार्ववर्णिकांसाठी या पंचमवेदाची निर्मिती ब्रह्मदेवाने केली. आपल्या ग्रंथात भरताने रूप या शब्दाची व्याख्या न देता दशरूपकांच्या वर्णनाला प्रारंभ केला आहे. यावरून असे समजते की भरतमुनींच्या पूर्वीपासून रूप हा शब्द आणि त्याचे दहा प्रकार समाजात इतके रूढ होते की भरतांना या शब्दाचे स्पष्टीकरण करण्याची गरज वाटली नाही. भरतमुनींनी

लिहिलेले नाटयशास्त्र हे नाटय या विषयावर उपलब्ध असलेले सर्वात प्राचीन वाङ्मय आहे.

देवांच्या विनंतीवरून ब्रह्मदेवाने 'नाटय' या पंचमवेदाची निर्मिती केली असे मानण्यात येते.

जग्राह पाठयमृग्वेदात्सामभ्यो गीतमेव च ।
यजुर्वेदादभिनयान् रसानाथर्वणादपि ॥ [६]

ऋग्वेदामधून पाठय आणि संवादशैली, सामवेदातून गायन, यजुर्वेदातून अभिनय आणि अथर्ववेदातून रस घेऊन या वेदाची निर्मिती करण्यात आली. शंकराकडून तांडव व देवी पार्वतीकडून लास्य असे नृत्य प्रकार घेऊन त्यांची योजना यात करण्यात आली. भगवान विष्णूंकडून आंगिक, वाचिक, आहार्य आणि सात्विक असे अभिनय मिळाले.

ऋग्वेदातून पाठय घेऊन नाटयनिर्मिती झाली असे मानण्यात येते. ऋग्वेदात अशी अनेक संवादस्थळे आहेत ज्याठिकाणी नाटयनिर्मितीचे मूळ पाहावयास मिळते. ऋग्वेदात पंधरा संवादसूक्ते आहेत. ज्यामधे नाटयांश अधिक प्रमाणात आढळतात. यम - यमी, उर्वशी - पुरुरवा, विश्वामित्र - नदी, अगस्त्य - लोपामुद्रा, सरमा - पणि, इंद्र - मरुत, इंद्र - आदिती- वामदेव, इंद्राणि - वृषाकपि, इंद्र - वासुकी, नेम भार्गव इंद्र, वसिष्ठ - पुत्र इत्यादी संवादसूक्ते ऋग्वेदात प्रसिद्ध आहेत. हे संवाद अतिशय नाट्यपूर्ण आहेत.

मॅक्समुल्लरने वेदांमध्ये संवाद कशासाठी आले याचे असे स्पष्टीकरण दिले आहे की, या संवादांचा अभिनय केला जात असावा. ऋग्वेदकाळातील लोक अशा नाटकीय दृश्यांचा अभिनय करत जी दृश्ये धार्मिक असत. ज्यामध्ये यज्ञकर्ते ऋत्विज् लोक हे स्वर्गीय देवता, मुनी यांची भूमिका करत. ऋग्वेदात सापडणारे काव्यात्मक संवाद हे नाटयाचेच अंश आहेत असे आपण म्हणू शकतो. या संवादात गद्य व पद्य दोहोंचाही समावेश होता. पद्याचा वापर केवळ तीव्र भावनावेगाच्या वेळी केला जात असावा. या पद्यांनाच संवादसूक्ते म्हणून संग्रहित केले गेले असावे.

The Vedic hymns were always sung and that in singing it would have been impossible for a single singer to make the necessary distinction between the different speakers. The hymns therefore represent the beginnings of a dramatic art.[7]

भरतमुनींनी नाटयशास्त्राच्या प्रथम अध्यायात रंगदेवतेला यज्ञसंमत म्हटले आहे.

यज्ञेन सम्मतं ह्येतद् रंगदैवतपूजनम् ।[८]

सामवेद हा संगीत परंपरेचा समृद्ध ग्रंथ आहे. सामवेदातील मंत्र हे केवळ पठण केले जात नाहीत तर त्यांना स्वरांचे आरोह, अवरोह यांचेही ज्ञान असावे लागते. ते गाईले जातात. म्हणून नाटयशास्त्रातील संगीत सामवेदातून घेतले आहे.

यजुर्वेदात अशी काही स्थाने आहेत जी यज्ञीय कार्ये - विधी कथन करतात. काही ठिकाणी अभिनयही करता येणे शक्य आहे. नाटयशास्त्रात अभिनय या शब्दाची व्याप्ती खूप मोठी आहे. रंगमंचावरील सजावट, वेशभूषा, अभिनयासाठी आवश्यक वस्तू, अलंकार वगैरे यांचाही समावेश अभिनयातच होतो. यजुर्वेदात यासाठी आवश्यक अनेक तत्त्वे आहेत. पारस्कर गृह्यसूत्रात असे म्हटले आहे की नृत्य - गायन या कला समाजात त्याकाळी प्रसिद्ध होत्या. पण नैतिकतावादी काही ब्राह्मण त्यांना समाजात स्थान देऊ इच्छित नव्हते.

अथर्ववेदात जारण, मारण, अभिचार, शत्रूविनाश इ. कृत्यांविषयी सांगितले गेले आहे. ज्यावेळी एखाद्यावर या क्रिया केल्या जातात. त्यावेळी त्यांचा अनुभव घेणाऱ्यांना रोमांच, घाम, थरथर, भीती इ. भावांचा अनुभव येतो. या भावांपासूनच रसनिष्पत्ती होते. म्हणूनच अभिनवगुप्ताचे असे म्हणणे आहे की अथर्ववेदातून अभिनयासाठी आवश्यक रसांचे ग्रहण करण्यात आले आहे.

पुरातनकाळी यज्ञ व उत्सव यासंबंधी अशा काही क्रिया होत्या ज्यामध्ये अभिनयाचा वापर होत असे. सोमयज्ञाच्यावेळी केला जाणारा सोमविक्रेता आणि अध्वर्यू संवाद हा संवाद व अभिनय या रूपात होत असे. यामध्ये पात्रे कोणा अन्य मनुष्याचे रूप घेऊन संवाद म्हणत. यज्ञकर्मातील कंटाळवाण्या व लांबलचक विधींमध्ये

हे अंतर्भूत असे. यज्ञप्रसंगी उपस्थित असलेले इतर लोक त्याचा आनंद घेत असत. यज्ञीय नाटकांमध्ये गीत, संवाद, नृत्य आणि संगीत यांचा समन्वय साधला जात असे.

काही विद्वानांच्या मते, संवादसूक्ते ही पद्यबद्ध असली तरी मूलतः ती गद्य-पद्य या दोन्ही स्वरूपातील होती त्यातील गद्य भाग समयानुसार नष्ट झाला. हा गद्यभाग या सूक्तांचे नाटयरूप स्पष्ट करत असावा. संवादसूक्तांचा अभिनय समाजाच्या उपस्थितीत मनोरंजनासाठी केला जात असावा. अग्निष्टोम यज्ञाच्या वेळी प्रस्तुत केला जाणारा अध्वर्यु-सोमविक्रयी संवाद हा उल्लेखनीय आहे. या संवादातील सोमविक्रेता आणि यजमान यांच्यात जी घासाघीस होते ती भाण व प्रहसन यांच्याशी मिळती जुळती आहे. कात्यायन श्रौतसूत्रांच्या विवरणावरुन हे स्पष्ट होते की सोमक्रय-विक्रय हे खरे नाही. हा संवाद हे एक छोटे प्रहसन आहे. ते आर्यांच्या जनभावनेचे प्रतीक आहे. सोमक्रय विक्रय ही यज्ञासाठी नेहमीची कृती आहे. परंतु सोमविक्रेत्यांना जी वागणूक मिळते, त्यांच्याकडून जी वादावादी होते, हावरटपणा, कंजूषपणा दाखवला जातो ती भावना या संवादातून व्यक्त होते.

लाट्यायन श्रौतसूत्रात (४.३.६-१२) ब्रह्मचारी - पुंश्चली संवाद आहे. यात कोणत्या दिशेला मुख करुन कोणते वाक्य म्हणावयाचे हे सांगितले आहे. वाक्याची पुनरुक्ती कोणत्या प्रकारे करायची हे ही दिले आहे. हे संवाद आजच्या काळात अश्लील वाटतील असे आहेत. हा संवाद हा यज्ञविधीचे एक अंग होते. ते छोटे नाटकच होते. लोक ते पाहून आनंदित होत. हे संवाद नाटकातील सर्व मूलभूत अटी पूर्ण करतात. संवादसूक्तांमधून देखील असे स्पष्ट होते की ही सूक्ते प्राचीन लोककथांवर आधारित आहेत व नाटकीय तत्त्वांनी युक्त आहेत. या संवादातील उत्तर प्रत्युत्तरात एक नाटकीय आवेग आहे. त्या त्या वेळची परिस्थिती एक नाटयस्वरूप उभे करते.

जीवनात घडणाऱ्या किंवा घडलेल्या रोमांचक घटनेवर आधारित हे संवाद असून यात नाटकीय तत्त्वे दिसून येतात. या अशा दैनंदिन घटनांवरच प्रहसन व भाण हे रूपकप्रकार आधारित आहेत.

रूपकाचे दहा प्रकार आहेत.

नाटकं सप्रकरणमङ्को व्यायोग एवच ।

भाण: समवकारश्च वीथी प्रहसनं डिम:॥

ईहामृगश्च विज्ञेया दशेमे नाटयलक्षणे ।

एतेषां लक्षणमहं व्याख्यास्याम्यनुपूर्वश:॥ [९]

या दहा प्रकारांचा उगम कशाप्रकारे झाला याचेही विवेचन भरताने नाटयशास्त्रात केले आहे. कैशिकी, भारती, सात्वती आणि आरभटी या चार वृत्ती आहेत. या चारींपासून नाटयनिर्मिती झाली आहे. या वृत्तींना मातृकावृत्ती असे म्हटले आहे. नाटयामधे पात्रांचा ज्या प्रकारचा व्यवहार असतो तो वृत्ती म्हणून ओळखला जातो. नाटयाचा आस्वाद घेणाऱ्या प्रेक्षकांच्या मनात त्या त्या रसाची जाणीव करुन देणे हे वृत्तींचे काम असते.

शृङ्गारे कैशिकी वीरे सात्त्वत्यारभटी पुन:।

रसे रौद्रे च बीभत्से वृत्ति सर्वत्र भारती ॥ [१०]

शृंगार रसामधे कैशिकी, वीर रसामधे सात्त्वती, रौद्र रसामधे आरभटी या वृत्तींचा प्रयोग केला जातो. भारती ही वृत्ती शब्दाची मानली जाते. ती सर्व रसांमधे असते.

रूपकप्रकारांपैकी एकेक रूपक प्रकाराचा परिचय येथे करून देत आहे.

**१)नाटक** :- नाटकाची लक्षणे पुढीलप्रमाणे :-

प्रख्यात वस्तुविषयं प्रख्यातोदात्तनायकं चैव ।

राजर्षिवंश्यचरितं तथैव दिव्याश्रयोपेतम् ॥

नाना विभूतिभिर्युतमृद्धि विलासादिभिर्गुणैश्चैव ।

अङ्क प्रवेशकाढयं भवति हि तन्नाटकं नाम ॥

नृपतीनां यच्चरितं नानारसभावचेष्टितं बहुधा ।

सुखदु:खोत्पत्तिकृतं भवति हि तन्नाटकं नाम ॥ [११]

प्रख्यात कथाविषय, उदात्तचरित्राचा प्रख्यात नायक, राजवंशाला अनुकूल आचरण, दिव्य देवतांचा आश्रय, समृद्धी व विलास इत्यादी गुणांनी तर अंक व

प्रवेश यांनी युक्त असे नाटक असते. विविध रस किंवा भाव यांना अनुसरून राजचरित्र असते तर सुख व दुःख यांची उत्पत्ती करणाऱ्या विविध घटनांनी युक्त असे नाटक असते.

नाटकांची व नाटककारांची उदाहरणे :-

प्रतिमानाटक-भास, मालविकाग्निमित्रम्,अभिज्ञानशाकुंतल, विक्रमोर्वशीयम् - कालिदास, अनर्घराघव- मुरारी, मुद्राराक्षस - विशाखादत्त, नागानन्दचरितम् - हर्षवर्धन इ.

२) **प्रकरण** :- लक्षणे - नाटक व प्रकरण यांच्या लक्षणात फारसा फरक नाही.

यत्र कविरात्मशक्त्या वस्तु शरीरंच नायकं चैव ।
औत्पत्तिकं प्रकुरुते प्रकरणमिति तद् बुधैर्ज्ञेयम् ॥
यदनार्षमथाहार्यं काव्यं प्रकरोत्यभूतगुणयुक्तम् ।
उत्पन्नबीजवस्तू प्रकरणमिति तदपि विज्ञेयम् ॥ वगैरे [१२]

भरताने नाटयशास्त्राच्या अठराव्या अध्यायात सहा श्लोकांमधे प्रकरण या रूपक प्रकाराची लक्षणे वर्णन केली आहेत.

कवीकडून उत्पाद्य अशी कथावस्तू जी कृत्रिम व नवनवीन कल्पनांनी युक्त असते, विप्र, वणिक्, पुरोहित, अमात्य इ. पुरुष पात्रे तर गणिका किंवा कुलस्त्री इत्यादी स्त्री पात्रे ज्या रूपक प्रकारात असतात अशास प्रकरण असे म्हणावे.

उदा. शारिपुत्र प्रकरणम्, मृच्छकटिक - शूद्रक, मालतीमाधव - भवभूती इ.

३) **अंक** :- करुण रस प्रधान असलेल्या या रूपक प्रकारात साधारण पुरुष नायक असतो. कथावस्तू जरी प्रसिद्ध असली तरी कवी कल्पनेने अतिविस्तृत केलेली असते.

अङ्क इति रूढिशब्दो भावैश्च रसैश्च रोहयत्यर्थान् ।
नानाविधानयुक्तो यस्मात्तस्माद् भवेदङ्कः। [१३]

अंक हा रूढी शब्द असून भाव व रस यांच्याद्वारे अर्थांचे सौदंर्य वाढवणे असा या रूढीचा अर्थ आहे.

उदा. शर्मिष्ठा ययाति - वत्सराज.

४) **व्यायोग** :- इतिहासातील प्रसिद्ध कथावस्तू, नायकही प्रसिद्ध व धीरोध्दत, एकच अंक व एकच दिवसाचा वृत्तांत व स्त्री पात्रे अतिशय कमी असलेला हा रुपक प्रकार आहे.

व्यायोगस्तु विधिज्ञैः कार्यः प्रख्यात नायकशरीरः।
अल्पस्त्रीजनयुक्तस्त्वेकाहकृतस्तथा चैव ॥
बहवश्च तत्र पुरुषा व्यायच्छन्ते यथा समवकारे ।
न च दिव्यनायकयुक्तः कार्यस्त्वेकाङ्क एवायम् ॥
न च दिव्यनायककृतः कर्यो राजर्षिनायकनिबद्धः।
युद्धनियुद्धार्षणसंघर्षकृतश्च कर्तव्यः॥ [१४]

नायक व कथा हे इतिहासप्रसिद्ध असावेत. स्त्री पात्रे थोडी, एका दिवसात प्रयोग करणे शक्य असते. एकच अंक व अधिक पुरुष पात्रे. नायक राजर्षी असतो. युद्ध, संघर्ष नसतात.

उदा. मध्यमव्यायोग- भास.

५) **भाण** :- भारतीवृत्तीची अधिकता असलेल्या या रुपकप्रकारात कथानक कविकल्पित असते.

आत्मानुभूतशंसी परसंश्रयवर्णनविशेषस्तु ।
विविधाश्रयो हि भाणो विज्ञेयस्तु एकाहार्यश्च ॥ [१५]

स्वतःबाबतीत घडलेल्या घटना, तसेच दुसऱ्याबाबत घडणारे प्रसंग यांची चर्चा एकच पात्र करत असते. ही रचना म्हणजे भाण होय.

केवळ एकच पात्र तेही बुद्धिमान व धूर्त असते व कार्यकुशल असते. रंगमंचावर दुसऱ्या कुणा पात्राची कल्पना करुन बोलण्याला संवादाचे स्वरुप दिले जाते. या एकांकी रचनेत आंगिक अभिनयही असतो. शृंगार व वीर रस हे प्रमुख असतात. टवाळखोरी, जादू, धूर्तलोक, गणिका इ.ची वर्णने, ऋतुवर्णने हे भाणाचे विषय असतात.

उदा. रससदन भाण - युवराज, शृंगारभूषणभाण - वामनभट्ट इ.

एकपात्री प्रयोगाची बीजे या रूपक प्रकारात आढळून येतात.

६) **समवकार** :- समवकार या शब्दाचा अर्थ आहे सर्व नायकांचे प्रयोजन एकच असणे किंवा ध्येय एकच असते. या रूपक प्रकारात अनेक नायकांचे एकत्र कार्य असते. म्हणून याला समवकार असे म्हटले जाते.

लक्षण :- देवासुरबीजकृतः प्रख्यातोदात्तनायकश्चैव ।

त्र्यङ्कस्तथा त्रिकपटस्त्रिविद्रवःस्यात्रिशृङ्गारः॥ [१६]

देव व राक्षसांना त्यांचे अभिष्ट प्राप्त करुन देणारी कथानकाची रचना असते. प्रसिद्ध व उदात्त चरित्राचे बारा नायक असतात. तीन अंक, स्वाभाविक, दैविक व कृत्रिम (शत्रुकृत) असे तीन प्रकारचे कपट, चेतनकृत (मनुष्यकृत) अचेतनकृत, चेतनाचेतनकृत असे तीन प्रकारचे विद्रव (उपद्रव), धर्मशृंगार, अर्थशृंगार व कामशृंगार असे तीन प्रकारचे शृंगार यात असतात.

उदा. समुद्रमंथन - वत्सराज

७) **वीथी** :- शृंगार रस प्रधान असून अन्य रसांचेही दर्शन यात होते. यात एक किंवा दोन पात्रे असतात.

सर्वरसलक्षणाढया युक्ता हयङ्गैस्त्रयोदशभिः।

वीथी स्यादेकाङ्का तथैकहार्या द्विहार्या वा ॥ [१७]

रसाच्या सर्व लक्षणांनी युक्त, तेरा अंगांनी युक्त, एक किंवा दोन पात्रांनी अभिनय करण्यायोग्य कथानक आणि एकच अंक असणारा हा रूपक प्रकार आहे.

उत्तम, मध्यम, व अधम अशी तीन प्रकारची पात्रे असतात.

उद्घात्यक, अवगलित, अवस्यंदित, नाली, असत्प्रलाप, वाक्केली, प्रपंच, मृदव, अधिबल, छल, त्रिगत, व्यवहार व गंड ही वीथीमधील तेरा अंगे होत.

उदा. माधवी - वत्सराज

८) **प्रहसन** :-

प्रहसनमपि विज्ञेयं द्विविधं शुद्धं तथाच सङ्कीर्णम् । [१८]

प्रहसन या रूपक प्रकारात हास्यरस प्रधान असतो. कायिक व वाचिक अभिनयाचा उपयोग करुन हास्य निर्माण केले जाते.

भरतमुनींनी नाटयशास्त्रात शुद्ध व संकीर्ण असे प्रहसनाचे दोन प्रकार सांगितले आहेत.

तपस्वी लोकांनी युक्त, विकृत भाषाहीन, भावपूर्ण वर्णनांनी युक्त असे प्रहसन शुद्ध होय तर लज्जा, संकोच यांचा अभाव, लौकिक घटना, प्रसंग, व्यवहार यांची उडवलेली खिल्ली, नपुंसक, विट, वेश्या अशी पात्र रचना असेल तर ते प्रहसन संकीर्ण होय.

मात्र धनंजयाने दशरूपकात प्रहसन शुद्ध, विकृत व संकीर्ण असे तीन प्रकारचे सांगितले आहे.

शुद्ध प्रहसनाचा उद्देश निखळ हास्यनिर्मिती हा असतो. ब्राह्मण, पुरोहित, विट, चेट, संन्यासी, तपस्वी इ. पात्रे प्रहसन प्रकारात आढळतात.

विकृत प्रहसनात नपुंसक, कंचुकी इत्यादी पात्रे असून त्यांचे हावभाव व वेश कामुक असतात.

संकीर्ण प्रहसन हे धूर्त पात्रांनी युक्त असते. वीथीची तेरा अंगे यात संकीर्णपणे असल्याने यास यास संकीर्ण म्हटले जाते. हास्यरस भरपूर प्रमाणात असतो तसेच हास्याचे सहाही प्रकार यात असतात. उदा. भगवदज्जुकीयम् - बोधायन.

९) **डिम** :- इतिहासप्रसिद्ध कथावस्तू असलेल्या या रूपकप्रकारात अनेक नायक असतात. कैशिकी शिवाय इतर सर्व वृत्तींचा प्रयोग केलेला असतो. रौद्ररस प्रधान असतो. शृंगार व हास्य सोडून इतर सर्व रसांचा प्रयोग होतो. चार अंक व चार संधी यांनी हा रूपकप्रकार युक्त असतो.

प्रख्यात वस्तुविषयः प्रख्यातोदात्तनायकश्चैव ।
षड्रसलक्षवणयुक्तश्चतुरङ्को वै डिमः कार्यः॥ [१९]

नायक व कथावस्तू प्रसिद्ध व उदात्त असते. शांत, शृंगार व हास्य हे सोडून सहा रसांनी युक्त चार अंकी रचना असते. रौद्र, वीर, भयानक या रसांचे आधिक्य

असते. इंद्रजाल, राक्षस, गंधर्व, भूत, पिशाच्च, संग्राम इ. १६ प्रकारच्या व्यक्तिरेखा यात असतात.

उदा. त्रिपुरदाह - वत्सराज.

१०) **ईहामृग**:- या चार अंकी रूपकप्रकारात नायक व प्रतिनायक इतिहास प्रसिद्ध धीरोध्दत व्यक्तिरेखा असतात. शृंगार रसही अंतर्भूत असतो. दिव्य नायिकेच्या प्राप्तीसाठी युद्धप्रसंगही दाखवले जातात. नायक हा नायिकेशी अनुरक्त असतो जी हरिणीप्रमाणे अलभ्य असते. म्हणून याला ईहामृग म्हणतात.

दिव्यपुरुषाश्रयकृतो दिव्यस्त्रीकारणोपगतयुद्धः।

सुविहितवस्तुनिबद्धो विप्रत्ययकारकश्चैव ॥ [२०]

नायक हा दिव्य पुरुष असतो. दिव्य स्त्रीच्या प्राप्तीसाठी युद्धप्रसंग उद्भवतो. सुसंबद्ध रचना असूनही एखादा विरुद्ध अनुभव किंवा प्रत्यय येऊ शकतो.

उदा. रूक्मिणीपरिणय - वत्सराज

याशिवाय अठरा प्रकारची उपरूपके आहेत. विश्वनाथाने साहित्यदर्पणात १८ प्रकारची उपरूपके सांगितली आहेत.

नाटिका, त्रोटक, गोष्ठी, सट्टक, नाटयरासक, प्रस्थानक, उल्लास्य, काव्य, प्रेंखण, रासक, संलापक, श्रीगदित, शिल्पक, विलासिक, दुर्मल्लिका, प्रकरणिका, हल्लीश, भाणिका.

**प्रहसन** :-

प्रहसन हा रूपक प्रकार हास्यरसप्रधान आहे.

विकृताकृतिवाग्वेषैरात्मनोऽथ परस्य वा ।

हासः स्यात्परितोषोऽस्य हास्यस्त्रिप्रकृति स्मृतः ॥ [२१]

आपली किंवा दुसऱ्याची विकृत आकृती, वाणी किंवा पोशाखाद्वारे निर्माण होणाऱ्या रसाला हास्य रस म्हणतात. तो आत्मस्थ व परस्थ अशा दोन प्रकारचा असतो. हे दोन्ही प्रकार उत्तम, मध्यम व अधम अशा तीन पुरुषांपासून उत्पन्न होतात. अशा प्रकारे तो सहा प्रकारचा होतो.

स्मितमिहविकसित नयनं किंचिल्लक्ष्यद्विजं तु हसितं स्यात् ।
मधुरस्वरं विहसितं सशिरः कम्पमिदमुपहसितम् ॥
अपहसितं सास्त्राक्षं विक्षिप्ताङ्गम् भवत्यतिहसितम् ।
द्वे द्वे हसिते चैषां ज्येष्ठे मध्यमेऽधमे क्रमशः॥ [२२]

स्मित, हसित, विहसित, उपहसित, अपहसित, अतिहसित हे ते सहा प्रकार होत. भरमुनींच्या नाटयशास्त्रातील **नाटयंभावानुकीर्तनम्** या चौथ्या प्रकरणात या सहा प्रकारांचे विश्लेषण आले आहे.

स्मित हास्य या प्रकारात दात दिसत नाहीत. गाल फुगलेले असतात व दृष्टी सुंदर व कटाक्षाने युक्त असते.

हसित या प्रकारात चेहरा व डोळे या दोन्हींचा विकास होतो. दात किंचित दिसतात. गाल फुगलेले असतात.

विहसित या हास्य प्रकारात गाल आणि डोळे यांचे थोडे आकुंचन होऊन ते बारीक दिसतात. हसताना तोंडावाटे मधुर आवाज येतो. चेहरा लालसर होतो.

उपहसित या प्रकारात नाक फुगलेले दिसते. हसणाऱ्या व्यक्तीची दृष्टी थोडी वक्र होते. खांदे हालतात तर डोळे आकुंचित होतात.

अपहसित या प्रकारात हसून हसून डोळयातून पाणी येते. खांदे व मस्तक यांना कंप सुटतो.

अतिहसित या हास्य प्रकारात डोळयावाटे सतत पाणी येते. तोंडावाटे मोठा व तीव्र आवाज होतो. हसणे असह्य होऊन माणूस पोट व पार्श्वभाग दाबू लागतो.

नाटयशास्त्रानुसार अभिनय करताना उत्तम प्रकृतीच्या माणसाने स्मित व हसित या हास्यप्रकारांचा वापर करणे योग्य असते. मध्यम प्रकृतीच्या माणसाला विहसित व उपहसित या हास्यप्रकारांचा वापर शोभा आणतो तर अधम प्रकृतीच्या मनुष्याला अपहसित व अतिहसित यांचा अभिनय शोभतो.

हसण्याच्या प्रकारावरुन मनुष्याची प्रवृत्ती दिसून येते. नायक, नायिका इत्यादी उत्तम किंवा प्रथम दर्जाच्या अभिनेत्यांना स्मित व हसित शोभून दिसते.

प्रहसन हा रूपक प्रकार हास्य या चित्तवृत्तीवर आधारित आहे. प्रहसन या रूपक प्रकारामधे दोन प्रकारे उपयोग केला जातो. हास्य उत्पन्न झाल्यामुळे मानवजीवनातील ताण कमी होऊन शांतता व मानसिक स्वास्थ्य मिळते तर समाजातील व्यंग्य समोर येऊन वाणीतील उपरोधाचा वापर होऊन समाजातील विकृतींवर आघात होतो. लेखक समाजातील वाईट चालीरीती, कुप्रथा यांवर अशाप्रकारे प्रहार करतो की कोठेही व्रण तर दिसत नाही परंतु मर्मभेदी आघातामुळे इष्ट परिणाम दिसून येतो. समाजातीलच नव्हे तर प्रत्येक वाईट प्रवृत्तीवर प्रहार करुन समाजाचे हित साधणे हा प्रहसनांचा उद्‌देश होय.

अन्य नाटय प्रकारांपेक्षा प्रहसने जास्त लोकप्रिय होण्याचे एक कारण म्हणजे त्यांचे लघुरूप होय तसेच अभिनय करण्यासाठी विशेष कोणत्याही नेपथ्याची, सजावटीची गरज भासत नाही. नाटक, प्रकरण इत्यादी रूपक प्रकार रोचक आहेत. परंतु त्यांना विशिष्ट रंगमंच, वेशभूषा इ. ची गरज असते तसेच त्यांना सादरीकरणासाठी अधिक वेळ लागतो. परंतु प्रहसन मात्र कमी वेळात सादर होऊन अधिक प्रभावी ठरते. तसेच इतर रूपकांमध्ये अनेक रसांचा अंतर्भाव होतो. त्यामुळे त्याचा प्रभाव प्रेक्षकांच्या मनावर सलगपणे होत नाही. याउलट प्रहसन हे हास्यरस प्रधान असल्याने त्यातील उद्‌देश सफल होण्यासाठी अधिक उपयुक्त ठरते.

म.म. मम्मटभट्‌टाने काव्याचे जे उद्‌देश सांगितले आहेत त्यात अर्थप्राप्ती, ख्याती, उपदेश प्रवणता आणि अनिष्ट निवारण इत्यादी सांगितले आहेत. यापैकी पहिल्या दोन्ही सोबतच समाजमनावर चांगल्या सवयी अंगी बाणवणे, वाईट प्रथा, रूढी, व्यसने यांचा त्याग करणे हा उददेशही मिळतो तर समाजातील वाईट प्रथा, प्रवृत्ती यांपासून आपले रक्षण करणे हा उद्‌देशही साध्य होतो.

प्रहसन या रूपक प्रकाराचे कथानक कविकल्पित असते. ते ठराविक कालखंडातील असावे (ऐतिहासिक किंवा पौराणिक) असे बंधन नसते. लेखक आपल्या कल्पनेनुसार कथानक ठरवू शकतो. सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील कटू सत्ये प्रेक्षकांसमोर हास्य स्वरुपात यावीत हे प्रहसनात अपेक्षित असते. याद्वारे समाजातील कुरीती, वाईट प्रथा, श्रद्‌धा, अंधश्रद्‌धा समाजासमोर आणण्यासाठी प्रहसनांची रचना

केली जाते. समाजातील अधम स्तरातील व्यक्ती यात पात्रे म्हणून अभिनय करतात. प्रहसनात एक किंवा दोन अंक असणे अपेक्षित आहे. कथानक हे एक घटना किंवा एक समस्या एवढे मर्यादित असावे लागते ज्यामुळे प्रहसन एक किंवा दोन अंकात संपू शकेल. कथावस्तू ही आधिकारिक आणि प्रासंगिक अशा दोन प्रकारची असते. यापैकी आधिकारिक कथावस्तू ही रूपकाची मुख्य कथा असते तर प्रासंगिक कथावस्तू ही मूळ कथेवर अवलंबून असते. या प्रकारांपैकी प्रहसनामधे आधिकारिक कथावस्तू वापरली जाते. एखादा प्रसंग किंवा घटना वा समस्या या कथानकात विकसित होऊन समाप्त होते. या काळातच प्रवाहीपणामुळे कथानकानुसार प्रेक्षकांवर त्याचा अपेक्षित परिणाम होतो.

हास्य हा या रूपक प्रकाराचा प्रधान रस असून त्या त्या कथानकाच्या अनुषंगाने करूण, शृंगार, वीर रस हे अंगी रस येतात. समाजातील दंभस्फोट करण्यासाठी उपहासगर्भ भाषा वापरली जाते. समाजातील विक्षिप्त आचारांवर टीका केली जाते.

**प्रहसनाची लक्षणे** :-

रूपक प्रकारांचे वर्णन करताना नाटयशास्त्रानुसार प्रहसनांची लक्षणे व प्रकार या आधीच वर्णन केले आहेत.

धनंजयाने 'दशरूपकात' प्रहसन हे शुद्ध, विकृत आणि संकीर्ण असे तीन प्रकार सांगितले आहेत.

तद्वत् प्रहसनं त्रेधा शुद्धवैकृतसङ्करैः।
पाखण्डिविप्रप्रभृतिचेटचेटीविटाकुलम् ॥
चेष्टितं वेषभाषाभिः शुद्धं हास्यवचोन्वितम् ॥
कामुकादिवचोवेषैः षण्ढकञ्चुकितापसैः॥
विकृत सङ्कराद्वीथ्यासंकीर्ण धूर्तसङ्कुलम ।
रसस्तु भूयसा कार्यः षड्विधो हास्य एव तु ॥ [२३]

याशिवाय इतर अनेक नाटयाचार्यांनी प्रहसनांचे वर्गीकरण केले आहे.

अभिनवभारती या आपल्या ग्रंथात अभिनवगुप्तांनी प्रहसनाच्या सामान्य लक्षणांसोबत काही विशष लक्षणेही सांगितली आहेत.

हास्यवादसंबद्धम्, परिहासभाषणप्रायम्, लोकोपचारयुक्त वार्ता एवं दम्भसंयोगुः।

प्रहसन हा रूपकाचा असा प्रकार आहे, ज्यात कुत्सित व्यक्तींच्या हास्य युक्त वचनांनी व आचरणाने प्रेक्षकांचे मनोरंजन होते.

कथानक समाजात वास्तवात घडणारे असते. धूर्त व लबाड लोकांच्या दंभाने युक्त असे असते.

धनंजय, सागरनंदी, शारदातनय, शिंगभूपाल, विश्वनाथ यांनीही सर्वसाधारणपणे भरतमुनींच्या प्रमाणेच रूपकाचे विवेचन केले आहे.

**संधी व संध्यंगे** :-

रूपकप्रकारांमधे कथावस्तूचे संघटन सर्वसामान्यतः संधींमधे होते. पाच प्रकारच्या संधी असतात. मुख, प्रतिमुख, गर्म, अवमर्श, निर्वहण. कथावस्तू मर्यादित असल्यामुळे पाच प्रकारच्या संधी, अर्थ प्रकृती व अवस्था यांचे विवरण प्रहसनात येऊ शकत नाही. नाटयशास्त्रावरील आचार्यांनी मुख व निर्वहण या दोनच संधी प्रहसनात येऊ शकतात असे म्हटले आहे.

मुख संधीची बारा अंगे असतात - उपक्षेप, परिकर, परिन्यास, विलोभन, उक्ती, प्राप्ती, समाधान, विधान, परिभावना, उद्भेद, भेद, करण[२४]

निर्वहण संधीची १४ अंगे आहेत. संधी, विबोध, ग्रंथन, निर्णय, परिभाषण, प्रसाद, आनंद, समय, कृती, भाषा, उपगूहन, पूर्वभाव, उपसंहार, प्रशस्ति, [२५] प्रहसनामधे सर्व संध्यंगांचा वापर पूर्णपणे झालेला दिसत नाही.

**वृत्ती** :-

प्रहसनात भारती ही शब्दवृत्ती प्रधान असते. प्रहसनामधे सर्व पात्रांचे विविध प्रकारचे बोलणे, विचित्र वाचिक अभिनयामुळे हे घडते. हास्यरस प्रधान असल्याने येथे शृंगाररसाला वाव नसतो. म्हणून कैशिकी वृत्ती नसते.

कैशिकी वृत्ति हीनानि रूपाण्येतानि कारयेत् । [२६]

रौद्र, वीर, अद्‌भुत रसांचाही या रूपक प्रकारात अंतर्भाव होत नाही. म्हणून सात्त्वती वृत्तीही वापरली जात नाही. विश्‍वनाथ इ. आचार्यांनी आरभटी या वृत्तीचाही वापर निषिद्‌ध सांगितला आहे.

रसार्णवसुधाकर या ग्रंथात शिंगभूपाल याने प्रहसनांगांचा उल्लेख केला आहे. अवगलित, अवस्कंद, व्यवहार, विप्रलम्भ, उपपत्ति, भय, अनृत, विभ्रांती, गद्‌गद्‌वाक, प्रलाप.

या दहा अंगांचा वापर प्रहसन अधिक मार्मिक व रोचक बनवण्यासाठी केला जातो. या दहा अंगांच्या वापराविषयी कोणताही नियम नाही. आवश्यकतेनुसार ही वापरली जातात.

**निष्कर्ष** :-

जगात सर्वत्र साहित्यनिर्मिती होते ती कोणत्या ना कोणत्या उद्‌देशाने होते. ती म्हणजे मनोरंजन किंवा सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव करुन देणे. या साहित्य निर्मितीला जसा प्राचीन साहित्यिकांचा हातभार लागला आहे तसाच नवीन आधुनिक साहित्यिकांचाही आहे. त्यामध्ये श्री. जीवन्यायतीर्थ भट्‌टाचार्य यांचेही नाव आधुनिक साहित्यकारांमधे अग्रक्रमाने घ्यावे लागेल. जीवनातील आदर्शवाद आणि वास्तववाद यांची सांगड घालून साहित्यनिर्मिती केली जाते. साहित्यनिर्मितीतून समाजाने बोध घ्यावा. सामान्य जनांचे हित व्हावे ही अपेक्षा असते. भरतमुनींनी नाटयशास्त्रावरील आपल्या ग्रंथात दहा रूपक प्रकारांची ओळख व लक्षणे वर्णन केली आहेत. त्यावरुन असे लक्षात येते की वैदिक काळापासून मनोरंजनासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. लाट्‌यायन श्रौत सूत्रातील ब्रह्मचारी पूंश्चली संवाद, अग्निष्टोम यज्ञावेळचा अध्वर्यु-सोमविक्रयी संवाद ही त्या काळातील रूपकांची उदाहरणे आहेत. रूपकांचा उगम मुख्यतः दैनंदिन समस्यांवर आधारित घटनांपासून झाला. प्रहसन हा रूपक प्रकार हास्य या चित्तवृत्तीवर आधारित असून समाजातील वाईट चालीरीती, प्रथा किंवा आधुनिक काळातील बेरोजगारी, व्यसनाधीनता इत्यादी

समस्यांवर व्यंग्यात्मक रीतीने प्रहार केला जातो. व्यंग्य हास्यात्मक रीतीने समोर आल्याने मानवी मनावर आघात न पोहोचता हृदयाला भिडते व हसण्याने ताणतणाव कमी होतात. थोडक्या वेळात, थोडया जागेत व कमी नेपथ्यात हा रूपकप्रकार सादर होतो.

नाटयशास्त्रात प्रहसन हा रूपक प्रकार वैविध्यपूर्ण असून केवळ मनोरंजनासाठी नव्हे तर समाजोपयोगीही आहे. याचा वापर विविध रूपककारांनी प्रहसन लेखनात करून घेतलेला आढळतो.

# संदर्भ सूची


१) साहित्यदर्पण (६/१)

२) दशरूपक - धनंजय (१/७)

३) भ.ना.शा. (१-१०८, १०९ )

४) भ.ना.शा (१-१०८, १०९)

५) भ.ना.शा (१-११४)

६) भ.ना.शा (१-१७)

७) The Sanskrit Drama - A.B. Keith

८) ना.शा. (१.१२३)

९) भ.ना.शा (१८-२,३)

१०) दशरूपक (२-९५)

११) ना.शा. (१८-१०, ११,१२)

१२) ना.शा. (१८-४५ ते ५०)

१३) ना.शा. (१८ ते १४)

१४) ना.शा. (१८-९० ते ९२)

१५) ना.शा. (१८-१०८)

१६) ना.शा. (१८-६३)

१७) ना.शा. (१८-११२)

१८) ना.शा. (१८-१०१, )

१९) ना.शा. (१८-८४)

२०) ना.शा. (१८-७८)

२१) दशरूपक (४-७५)

२२) दशरूपक (४-७६, ७७)

२३) दशरूपक (३-५४, ५६)

२४) दशरूपक ( १-२५, २६)

२५) दशरूपक ( १-४९, ५०)

२६) ना.शा. ( १८-९)